## ❖ श्रेणीसुधार/गुणसुधार योजना –

श्रेणी/गुणसुधार (Class Improvment) योजने अंतर्गत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी पुनःश्च परीक्षेस प्रविष्ट होण्याची एक संधी मार्च २००८ पासून लागू करण्यात आली होती. त्यामध्ये अंशःता बदल करुन फेब्रुवारी/मार्च २०१३च्या परीक्षेपासून विद्यार्थ्यांना (एकाच वेळी सर्व विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या) लगतच्या परीक्षांना ऑक्टोबर व मार्च च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षेस 'श्रेणी सुधार' साठी प्रविष्ट होण्यास दोन संधी देण्यात आल्या आहेत.

## ❖ श्रेणी/गुणसुधार योजनेनुसार परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी अटी व शर्ती (अर्ज करण्याची कार्यपध्दती)

१) ही योजना नियमित विद्यार्थी म्हणून परीक्षेस प्रविष्ट झालेल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाच लागू राहील.

२) एकाच वेळी सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेला विद्यार्थीच या योजनेखाली अर्ज करू शकेल. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांने स्वतंत्र आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

३) एकाच वेळेस श्रेणी सुधार आणि तुरळक विषय घेवून (Isolated) म्हणून प्रविष्ट होता येणार नाही.

४) विद्यार्थ्याला त्याने उत्तीर्ण केलेले सर्व विषय घेणे बंधनकारक राहील. नव्याने कोणताही/कोणतेही विषय घेता येणार नाहीत.

५) विद्यार्थ्यांने उत्तीर्ण केलेल्या परीक्षेनंतरच्या लगेच लगतच्या परीक्षेसाठीच ही संधी फक्त दोनदा उपलब्ध राहील. उदा. मार्चमध्ये उत्तीर्ण झालेला विद्यार्थी लगतच्या ऑक्टोबर व मार्च परीक्षेस या योजनेखाली प्रविष्ट होवू शकेल. लगतच्या परीक्षेसाठी पहिली संधी आणि त्यानंतर लगतच्या परीक्षेसाठी दुसरी संधी उपलब्ध असेल. पहिल्या संधीचा लाभ उमेदवाराने न घेतल्यास त्यास दुसरी संधी उपलब्ध असेल. मात्र ही संधी अंतिम असेल. या संधीनंतर त्यास या योजनेनुसार पुन्हा परीक्षेस प्रविष्ठ होता येणार नाही व तशी मागणी करता येणार नाही.

६) विद्यार्थ्याला आधीच्या परीक्षेतील अंतर्गत मूल्यमापन, प्रकल्प व शालेय श्रेणीच्या विषयांमध्ये मिळालेले गुण/श्रेणी या योजनेखाली होणाऱ्या परीक्षेसाठी ग्राहय धरल्या जातील (Carry Forward) मात्र लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षांचे पूर्वीचे कोणतेही गुण या योजनेमध्ये ग्राहय धरले जाणार नाहीत या परीक्षांकरिता नव्याने प्रविष्ठ व्हावे लागेल.

७) या योजनेखाली प्रविष्ट होताना विद्यार्थ्याला विषय/शाखा, माध्यम, केंद्र, विभाग बदल अनुज्ञेय राहणार नाही.

८) विद्यार्थी ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून आधीच्या परीक्षेला प्रविष्ट झाला असेल त्याच शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून त्याने आवेदनपत्र सादर करणे आवश्यक राहील व सदर शाळा/कनिष्ठ महाविद्यालय ज्या परीक्षा केंद्राच्या कार्यकक्षेत आहे तेच परीक्षा केंद्र त्याला निवडावे लागेल.

९) या विद्यार्थ्यांचा निकाल सदर परीक्षेच्या इतर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबर जाहीर केला जाईल. मात्र या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका निकालाच्या दिवशी मिळणार नाही.

१०) निकाल जाहीर झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना या योजनेखाली प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका घेताना पूर्वी प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारावयाची आहे की नवीन परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारावयाची आहे हा विकल्प (विकल्प फॉर्मच्या नमुन्यात) देण्याचा अधिकार असेल. विद्यार्थ्याला संपूर्ण नवीन किंवा संपूर्ण पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारणे बंधनकारक राहील. काही विषयांचे गुण जुन्या परीक्षेचे व काही विषयांचे गुण नवीन परीक्षेचे अशी मागणी करता येणार नाही. निकाल प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत एक महिन्याच्या आत त्यांनी श्रेणी सुधार योजने अंतर्गत उत्तीर्णतेची गुणपत्रिका स्विकारण्याबाबत विकल्प अर्ज विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य राहील. एक महिन्यापर्यंत मागणी केल्यास गुणपत्रिका विनामुल्य देण्यात येईल, व तदूनंतरच्या पाच महिने कालावधीपर्यंत नियमानुसार शुल्क आकारून सुधारीत गुणपत्रिका घेता येईल.

११) विद्यार्थ्यांने या योजनेखाली प्रविष्ठ झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारण्याचा निर्णय घेतल्यास त्याला यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका मंडळाकडे विकल्पासोबत जमा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच त्याला सदर योजनेखाली प्रविष्ट परीक्षेची गुणपत्रिका देण्यात येईल. जुन्या परीक्षेची संपादणूक स्वीकारण्याचा विकल्प दिल्यास नवीन परीक्षेची संपादणूक रद्दबादल ठरविण्यात येईल.

१२) सदरहू योजनेखाली प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांने नवीन गुणपत्रिका स्वीकारण्याचे ठरवल्यास त्या गुणपत्रिकेवर 'श्रेणी सुधार योजनेअंतर्गत' (Under Class improvement scheme) असा उल्लेख असेल.

१३) या योजनेअंतर्गत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षाशुल्क नियमित/पुनर्रपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निर्धारित शुल्काच्या दुप्पट शुल्क आकारले जाईल. एकदा भरलेले शुल्क परत दिले जाणार नाही व पुढील परीक्षेसाठी राखून ठेवता येणार नाही.

१४) नियमित उत्तीर्ण विद्यार्थी या योजनेनुसार सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये होणाऱ्या परीक्षेस पुन्हा प्रविष्ट होवू इच्छितात त्यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधावा व मंडळाच्या सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

१५) विद्यार्थ्याने गुणपडताळणीसाठी अर्ज केला असेल व गुणपडताळणीच्या निकालामुळे विद्यार्थ्याचे समाधान झाले असल्यास श्रेणीनुसार योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ठ व्हायचे किंवा नाही हा निर्णय पूर्णतः त्या विद्यार्थ्याचा असेल.

१६) या योजने अंतर्गत परीक्षेस प्रविष्ठ होणारे विद्यार्थी मंडळाच्या पारितोषिकासाठी तसेच क्रीडा गुण सवलतीसाठी पात्र असणार नाहीत.

१७) अपंग विद्यार्थ्यांना असलेल्या सवलती अनुज्ञेय राहतील.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४.